(१४९)

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ BS 881964

अनु.क्र. ०२५२ दि. १७/१०/२०२२ मु.शु.रक्कम ५००/-

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव मे. पुनर्जिया स्काय आय.ई.चर्स LLP

पत्ता 208 मुगाव ता मुळशी जि पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव पी एम आर डी ए

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता स्वप्निल शं. पवार - कोथरूड पुणे

Swapnil

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

सौ. विणा गोरख किरवे
परवाना क्र. २२०१०४९
वेताळनगर, कोथरूड, पुणे-३८

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

17 OCT 2022

प्रधान मुद्रांक लिपीक
कोथरूड पुणे

NOTARY
GORAKH VITTHAL KIRVE
Reg. No. 5511
DISTRICT PUNE
EXPIRY DATE 12/3/2023
GOVERNMENT OF INDIA

(238)

(15)

मी, एनर्जिया स्कायआय व्हेंचर्स एल एल पी तर्फे भागिदार श्री. सुशांत मोहन जाधव, वय - ४४ वर्षे, धंदा - शेती व व्यवसाय, पत्ता - सर्व्हे नं. २७४/१ व इतर, स्कायआय सॉंगबर्डस्, मौजे भुगांव, ता. मुळशी, जि. पुणे-४१२११५ हमीपत्र देतो की,

१) मौजे भुकुम, तालुका मुळशी, जिल्हा पुणे, येथील गट नंबर २१५ (पै.) व इतर या मिळकतीमध्ये निवासी/बिगर निवासी पद्धतीच्या प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक/कुलमुखत्यारपत्रधारक म्हणून मी/आम्ही दाखल केला आहे. तूर्त या जागी म. न. पा. कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला/ आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची किंवा व्यवस्था सोसायटीमार्फत करीत आहोत व त्यासंबंधी आवश्यक त्या वरिष्ठ भूवैज्ञानिके अधिकारी, भुजल सर्व्हेक्षण आणि विकास योजना (G. W. S. & D. A) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी/ बिगर निवासी वापरासाठी मनपा पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतींमधील रहिवाशांना मी/ आम्ही करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी/ आम्ही या हमीपत्राद्वारे स्विकारत आहे.

३) मनपा मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरू न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी/ आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळ्याचे विक्रीचे बुकींग करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करून घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजीत गाळेधारकांना करून दिल्यानंतरसुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकींगनंतर होणाऱ्या नियोजित गाळेधारकांना पाणीपुरवठा अपुरा झाला तर मनपाचा पुरेसा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत माझ्या/ आमच्या खर्चाने पुरेसा पाणी पुरवठा करून देण्याची माझी / आमची जबाबदारी राहील. मनपाला तोशीष लागू देणार नाही.

५) टँकरद्वारा किंवा बोअरद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची मी/ आम्ही काळजी घेईन/ घेऊ.

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक/मालक या नात्याने मी/आम्ही अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक/प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची मी काळजी घेईन / घेऊ.

७) हे हमीपत्र माझे/ आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी/आम्ही राजीखुषीने दि. 3/11/२०२२ रोजी लिहून दिले आहे.

पुणे

दिनांकः- 3/11/2022

हमीपत्र लिहून देणार

मे. एनर्जिया स्कायआय व्हेंचर्स एल एल पी
भागीदार श्री. सुशांत मोहन जाधव

BEFORE ME

GORAKH V. KIRVE
NOTARY
GOVT. OF INDIA
REG NO. 5511

NOTARY
GORAKH VITTHAL KIRVE
Reg. No. 5511
DISTRICT PUNE
EXPIRY DATE 12/3/2023
GOVERNMENT OF INDIA

- 3 NOV 2022

Noted & Registered
at.Sr No A851/2022

पाँच रुपये FIVE RUPEES NOTARIAL

पाँच रुपये FIVE RUPEES NOTARIAL

NOTARIAL

पाँच रुपये FIVE RUPEES NOTARIAL

पाँच रुपये FIVE RUPEES NOTARIAL